**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra,India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ आरएम/ २०२२-२३/ 18539-41

दिनांक:- ०७-०१-२०२३

प्रति,
**प्राचार्य / प्राचार्या,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ व सॅटेलाईट केंद्र इत्यादीबाबीसाठी विद्यापीठास विहित मुदतीच्या आत प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र दि. ०७-०१-२०२३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र अध्यादेश क्र. १३ दि. २४-११-२०२२.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करीता संदर्भिय क्र. (१) व (२) अन्वये नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ व सॅटेलाईट केंद्रासाठी दि. १५ जानेवारी, २०२३ पर्यंत नियामामध्ये विहित केलेल्या प्रारुप / नमुन्यामध्ये ऑनलाईनद्वारे सुधारित अध्यादेश-१५१ व १५२ अन्वये विहित केलेल्या शुल्काचा ऑनलाईनद्वारे भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्मसुध्दा दि. १५ जानेवारी, २०२३ पर्यंत ऑनलाईनद्वारे विद्यापीठास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी विहित नमुन्यातील अर्ज व विहित शुल्काचे चलन व पुरक दस्ताऐवजासह दि. २० जानेवारी, २०२३ पर्यंत हार्डकॉपी विद्यापीठ कार्यालयाचे शैक्षणिक विभागास सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दिनांकानंतर कोणतेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

कुलसचिव

प्रतिलीपी:-
१. संचालक, युनिक विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवून सुचित करण्यात येते की, नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणा अंतर्गत येणारे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयासाठी विहित असलेल्या प्रकियेप्रमाणे वेबसाईट तात्काळ आजपासून दि. १५ जानेवारी, २०२३ पर्यंत सुरु ठेवण्यात यावी.
२. वित्त व लेखा अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहिस्तव.

sd/-
कुलसचिव